Maharashtra State Board of Secondary &
Higher Secondary Education, Pune
S.R.No.832, Final Plot No. 178,179,
Near Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-04.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९, बालचित्रवाणी शेजारी,
आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूट च्या मागे, भांबुर्डा,शिवाजीनगर,
पुणे ४११ ००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 ; Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./भांडार-१/१३५७
पुणे-०४
दि. ०६/३/२०१९

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्य.व उच्च माध्य.शिक्षण मंडळ,
विभागीय मंडळ,
पुणे/नागपुर/औरंगाबाद/मुंबई/अमरावती/कोल्हापुर/नाशिक/लातूर/कोकण,

विषय: इ.१० वी मार्च २०१९ परीक्षेच्या कल-अभिक्षमता चाचणी अहवाल वाटपाबाबत
संदर्भ: या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./भांडार-१/१३५६ दि.०६/०३/२०१९

संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) मार्च २०१९ कल-अभिक्षमता चाचणी अहवालाचे साहित्य प्रेसकडून दि.१३/०३/२०१९ पर्यन्त विभागीय मंडळांना प्राप्त होणार आहे. सर्व शाळांची अहवालाची पाकिटे, विद्यार्थ्यांची पोहोच घेण्याचे तक्ते/ याद्या इ.साहित्याची पडताळणी करण्यात यावी.

सर्व विद्यार्थ्यांना कल-अभिक्षमता चाचणी अहवाल परीक्षा संपण्यापूर्वी वितरीत करावयाचे असल्याने विभागीय मंडळ स्तरावर पुढील सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी तसेच सदर सूचना आपले कार्यकक्षेतील [विभागीय मंडळास संलग्न] सर्व माध्यमिक शाळांना त्वरित कळविण्याची व्यवस्था करावी.

१] सदर अहवालांचे वाटप- शाळांना दि. १५/३/२०१९ रोजी [नेहमीप्रमाणे] जिल्हा संकलन/वितरण केंद्रावर करावे.

२] शाळांनी त्यांचे विद्यार्थ्यांना दि.१६/३/२०१९ ते २२/३/२०१९ या कालावधीतील इ.१० वी च्या पेपरच्या दिवशी संबंधित परीक्षा केंद्रावर, शाळा प्रतिनिधीने प्रत्यक्ष जावून विद्यार्थ्यांची तक्ता/ यादीवर स्वाक्षरी घेवून अहवालांचे वाटप करावे.

३] वाटपाचे काम पेपर संपल्यानंतरच करावयाचे आहे. तसेच अहवाल वितरित करतांना विद्यार्थ्यांचा, पुढील पेपरच्या अभ्यासाचा वेळ जाणार नाही, याची दक्षता शाळांनी घ्यावयाची आहे.

४] परीक्षा संपण्यापूर्वी सर्व विद्यार्थ्यांचे अहवाल वाटप करण्यात यावेत.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे-04

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर –४१६ ००४.**

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/ 3503.
कोल्हापूर ४१६००४.
दिनांक:–०६/०३/२०१९

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुख
सातारा, सांगली व कोल्हापूर.

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या **विद्यार्थ्यांच्या कल अभिक्षमता चाचणी अहवाल वाटपाबाबतचे** राज्य मंडळाचे जा.क्र.रा.मं./भांडार–१/१३५७ दि.०६/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घेऊन कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.